MHST080010072018

**नियमीत दिवाणी दावा क्र.७३/२०१८**

**श्री. गणपत भाऊसाो जाधव व इतर**

**विरुद्ध**

**सुरेश भिकू जाधव व इतर**

## निशाणी क्र.६१ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या म्हणण्यानुसार, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुद्ध निरंतरचे ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी यांनी प्रतिवादी क्र.४ मंडलाधिकारी, शिरवळ व प्रतिवादी क्र.५ मोजणी अधिकारी शिरवळ यांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील कलेले आहे. सदर प्रतिवादी क्र.४ व ५ हे सरकारी अधिकारी आहेत. त्यामुळे सरकार विरुद्ध दावा करत असताना कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्याबाबतची कोणतीही पूर्तता वादी यांनी केलेली नाही. तसेच, सदरचा दावा या मे. कोर्टास चालविणेचा अधिकार नसताना वादी यांनी मे. कोर्टाची दिशाभूल करुन दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे, त्यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल करुन सदरचा दावा काढून टाकण्याची विनंती केली.

**०३.** वादी यांनी निशाणी क्र.६४ अन्वये आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने फेटाळली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादींचा निशाणी क्र.५ मंजूर झाला असून प्रतिवादी यांनी त्यावर कोणतेही अपील दाखल केलेले नाही. दावा प्रलंबित ठेवण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तरी, सदरचा अर्ज

नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

**०४.** अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर आपला युक्तिवाद न्यायालयासमोर केलेला नाही. वादी यांनी आपला युक्तिवाद निशाणी क्र.६६ वर दाखल केलेला आहे. निशाणी क्र.५ वरील आदेशामध्ये परिच्छेद क्र.१६ मध्ये नमूद मजकूराबाबत वादीच्या विधिज्ञांनी लेखी युक्तिवादामध्ये कथन केलेले आहे. मूळ अर्जात वादी यांनी दावा करतेवेळीस तरतुदींचे पालन केलेले नाही, प्रतिवादी क्र.४ व ५ हे सरकारी अधिकारी असून मे. कोर्टाला चालवण्याचा अधिकार नसल्याबाबत कथन केलेले आहे.

**०५.** परंतु, निशाणी क्र.५ वरील आदेशामध्ये परिच्छेद क्र.१६ मध्ये असे नमूद केलेले आहे की, ''प्रतिवादी क्र.१, २ व प्रतिवादी क्र.३ यांचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.४ व ५ हे सरकारी नोकर असल्याने त्यांना दावा पूर्व नोटीस देणे आवश्यक होते. सदरील दावा दाखल झाला त्यावेळी सहाय्यक अधिक्षक यांनी कोणताही आक्षेप घेतला नसल्याचे दिसून येते. आक्षेप घेतला नसल्याने सदर दाव्यास नंबर देण्यात आला. प्रतिवादी क्र.४ व ५ हे जरी सरकारी नोकरदार असले तरी वादी यांची शासनाविरुद्ध कोणतीही मागणी नाही. तहसिलदार यांचे आदेशाने प्रतिवादी क्र.४ व ५ हे दाव्याची मोजणी करणेकरीता गेले होते. त्यामुळे, सदरील प्रकरणामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे नोटीसची आवश्यकता नसल्याचे दिसून येते''.

**०६.** उपरोक्त निशाणी क्र.५ वरील आदेश पाहता प्रतिवादी क्र.४ व ५ यांना नोटीसची आवश्यकता नसल्याबाबत लक्षात येते. त्यामुळे, सदरचा दावा हा या न्यायालयात चालविण्याचा अधिकारी वादीला आहे, हे स्पष्ट होते. करीता, खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

दिनांकः ०२.०५.२०२५
खंडाळा.

(श्रीमती क. अ. पट्टेबहादूर)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, खंडाळा